सद्रक्षणाय खलानिग्रहणाय

Tel. No.: 022-22620332
Email : pressroom.mum@mahapolice.gov.in

Government of Maharashtra
**Police Department**
Office of the Commissioner of Police,
Dr. D.N. Road, Mumbai-400001.

---

O.W.No. 608/ 2021 Date :- 19/11/2021

## —: प्रेसनोट :—

## विलेपार्ले पोलीस ठाणे — खुनाचा प्रयत्न

दिनांक १७/११/२०२१ रोजी वेळ २३:५० वा. च्या सुमारास इसम नामे रोशन राजेश शिंदे, वय २१ वर्षे, हे त्यांच्या ताब्यातील मो/सायकल क्र. एम.एच. ०२ ई.व्ही. ६४१६ यावरून कार्गो दिशेने सहार क्लासिक बिल्डींगचे गेट समोर, सहार कार्गो रोड, विलेपार्ले पुर्व, मुंबई या ठिकाणाहुन जात असताना यातील अटक आरोपी हा त्याचे मो/सायकल क्र. एम.एच. ०२ एफ.क्यु. ९३०९ यावरून कबीर नगरचे दिशेने जात असताना मो./सायकल समोरासमोर आल्याने पुढे घेण्याचे कारणावरून वाद विवाद झाले असता आरोपीताने त्याचे मो./सायकल चे डिक्की मधुन धारधार चाकु काढुन रोशन शिंदे यांच्या उजव्या खांदयाचे मागे, छातीच्या उजव्या बाजुला, उजव्या हाताचे दंडावर, छाती व पोटाचे मधोमध, डाव्या हाताच्या मनगटामागे वार केले व गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन फिर्यादी (मित्र) आकाश गौतम साल्वी, वय- २६ वर्षे, धंदा - रिक्षा चालक, रा.ठी. रूम नं. १३, डिलीमा चाळ, चकाला सहार रोड, पी. एन. टी. कॉलनीजवळ, विलेपार्ले पुर्व. मुंबई यांनी दिनांक १८/११/२०२१ रोजी दिलेल्या फिर्यादीवरुन गु.र.क्रं. ६९४/२०२१ कलम ३०७ भा.द.वि. सह ४,२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.